पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक- ०३/१२/२०१९**

## नक्षलवादयांविरोधातील "हुँकार रॅलीस" नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद

- **३ ते ४ हजार नागरिकांनी घेतली नक्षलविरोधी प्रतिज्ञा**
- **शालेय विदयार्थ्यांनी म. गांधीजीची प्रतिकृती साकारुन दिला अहिंसेचा संदेश**

नक्षलवादयांनी जनतेला पीएलजीए सप्ताह पाळण्याचे आवाहन करुन जिल्हयातील दिनांक-२७/११/२०१९ रोजी गॅरापत्ती हद्दीतील मौजा-भिमनखोजी या गावच्या मनोज दयाराम हिडको वय-१७ वर्ष या इयत्ता ११ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या निष्पाप विदयार्थ्याचा गोळी झाडुन खून केला तसेच यापुर्वी सुध्दा सुशिक्षीत बेरोजगार युवती बेबी मडावी व शिक्षक युगेंद्र मेश्राम यांची व जिल्हाभरात आतापर्यंत ५३० निष्पाप नागरिकांचा नक्षलवादयांनी खून केला आहे. नक्षलवादयांच्या या हिंसक कृतीचा निषेध करण्यासाठी ३ ते ४ हजार महिला तरुण-तरुणी, विदयार्थी-विदयार्थीनींनी गडचिरोली शहरातील इंदिरा गांधी चौक ते जिल्हा स्टेडियम गडचिरोली पर्यंत गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने "हुँकार रॅलीत" सहभागी होवुन नक्षलवादयांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.

सकाळी ८.०० वा. इंदिरा गांधी चौकातून रॅलीला सुरुवात झाली. यावेळी गडचिरोली जिल्हयातील महिला, तरुण, तरुणी, विदयार्थी, विदयार्थीनी असे ३ ते ४ हजार नागरिकांनी इंदिरा गांधी चौक ते जिल्हा क्रिडा भवन येथपर्यंत पायी चालत हातात नक्षलविरोधी बॅनर धरुन नक्षलवाद विरोधी घोषणा दिल्या.

जिल्हा क्रिडा भवन येथील मुख्य कार्यक्रमात बोलतांना मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़े. यांनी नक्षलवादयांनी खून केलेल्या ५३० आदिवासींचे स्मरण करत जिल्हयाच्या विकासात आडकाठी निर्माण करणाऱ्या तसेच आदिवासी बांधवांच्या रोजगाराला

पुरक ठरत असलेल्या कमलापुर येथील हत्ती कॅम्प उध्द्वस्त करणाऱ्या नक्षलींचा जाहीर निषेध व्यक्त करत नक्षलवादयांचा बिमोड करण्यासाठी गडचिरोली पोलीस दल सदैव तत्पर असल्याबाबतचे सांगितले. नक्षलवादाचा समुळ नायनाट करण्यासाठी आदिवासी बांधवांनी एकदिलाने व एक जुटीने एकत्र येत नक्षल गावबंदी करुन आदिवासींवर अन्याय करणाऱ्या नक्षल्यांना अजिबात थारा देवु नका असे आवाहन त्यांनी जनतेला केले.

यावेळी ५०० शालेय विदयार्थ्यांनी जगाला अहिंसेचा संदेश देणाऱ्या राष्ट्रपिता म. गांधी यांची प्रतिकृती मानवी साखळीतुन साकारत अहिंसेचा संदेश दिला.

गडचिरोली जिल्हा हा उदयोग विरहीत जिल्हा अशी असलेली त्याची जुनी ओळख पुसून टाकत असतांना आणि पर्यटन क्षेत्रात कमलापुर हत्ती कॅम्पच्या माध्यमातुन जिल्हयाचे नाव महाराष्ट्रभर गाजत असतांना नक्षलवादयांनी जिल्हयाच्या विकासात आडकाठी आणण्यासाठी आणि स्थानिक आदिवासी बांधवांचा रोजगारावर घाला घालण्यासाठी कमलापुर हत्ती कॅम्पची नासधुस केली याबाबत रॅलीत सहभागी नागरिकांनी नक्षलींचा तीव्र शब्दात निषेध केला. त्याचबरोबर नक्षलवादी दहशत पसरविण्यासाठी निष्पाप आदिवासी बांधवांचा बळी घेत असल्यामुळे नागरिकांनी तीव्र शब्दात नक्षलवादयांबद्दल निषेध नोंदविला.




नक्षलवाद हटाओ
गड़चिरोली बचाओ


देश को आगे बढ़ाना है
नक्षल मुक्त करना है।
मृतक - बेबी मडावी



